# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सायंकाळ)

जा.क्र. ४२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१८/०७/२०१६.

**१) टाटा सुमोची मोटार सायकलला धडक,एक जखमी . :—**

दिनांक १७/०७/२०१६ रोजी १०.०० वा. दर. फिर्यादी नवनाथ आनंदराव फेंडर वय ३० वर्ष, रा. वडेश्वर भंडारा हे मोटार सायकल क्र. एमएच ३५/ १८२० ने साकोली येथुन धर्मापुरी कडे जात असतांना धर्मापुरी कडुन येणा—या आरोपी टाटा सुमो एमएच ३०/पी १०२४ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक मारुन गंभिर दुखापत केल्याने फिर्यादीच्या तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३८ भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) महीलेस जातीवाचक शिविगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०७/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील पिडीत महीला ही आपल्या घरच्या कुत्र्याला घेवुन रामकृष्ण निरगुडे यांच्या घरी जावुन रोवण्या संबधाने त्यांच्याशी बोलणी करीत असतांना फिर्यादीचा कुत्रा आरोपीचे घराकडे गेला तेव्हा आरोपींनी कुत्र्यास मारपीट केली म्हणुन त्यांनी ''कुत्र्याला कशाला मारपीट करता असे हटकले'' असता आरोपीने फिर्यादीस तुझ्या कुत्र्याची लायसन्स आहे का असे बोलुन आरोपीने फिर्यादी सोबत भांडण करुन जातीवाचक शिविगाळ करुन अपमानित केले. व पाहुण घेण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३(१)(आर)(एस)अ.जा.ज.अ.प्र. कायदा सहकलम ५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागिय पोलीस अधिकारी श्री. संखे साकोली विभाग पो. स्टे. लाखनी हे करीत आहे.

**३) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०७/२०१६ रोजी १९.५० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन मोहाडी बस स्टॉप येथे आमरोडवर उभी करुन येणा—या वाहतुकीस अडथळा करीत असतांना मिळुन आला. असे सर तर्फे फिर्यादि पोना. गोमासे पो.स्टे. मोहाडी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. गोमासे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

O/C

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.